सन २०१६-१७ या प्रतिवदेन वर्षासाठी गट अ संवर्गातील निवडक अधिका-यांचे कार्यमूल्यमापन अहवाल ऑनलाईन पध्दतीने नोंदविण्यासाठी सुधारित अंतिम दिनांक.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : सीएफआर-१२१७/प्र.क्र.३७/तेरा
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २ फेब्रुवारी, २०१८.

वाचा :-१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : सीएफआर-१२११/ प्र.क्र.२५७/तेरा, दिनांक २.२.२०१७.
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :सीएफआर-१२१७/प्र.क्र.३७/तेरा, दिनांक १५.१२.२०१७

शासन परिपत्रक :-

गट-अ संवर्गातील शासकीय अधिकाऱ्यांच्या कार्यमूल्यमापन अहवालाचा सुधारीत नमुना वरील वाचा येथील दि.२.२.२०१७ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आला असून निवडक १२ संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल ऑनलाईन पद्धतीने नोंदविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी MahaPAR ही संगणक प्रणाली NIC मार्फत विकसित करण्यात आली आहे.

२. दिनांक २.२.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ नंतर कार्यमूल्यमापन अहवाल लिहिता येणार नाही. त्याआधारे MahaPAR या संगणक प्रणालीमध्ये देखिल दि.३१.१२.२०१७ नंतर कोणतेही अभिप्राय नोंदविणे शक्य होणार नसून त्यावेळी कार्यमूल्यमापन अहवाल ज्या स्तरावर असतील त्या स्तरावर ते अंतिम होतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. तथापि, महापार प्रणाली लागू करण्याचे हे पहिलेच वर्ष असल्याने व सदर प्रणाली प्रत्यक्षात कार्यान्वित होण्यास काही प्रमाणात झालेला विलंब विचारात घेऊन सदर मुदत दिनांक १५.१२.२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये दि.३१.१.२०१८ अशी करण्यात आली होती.

३. महापार प्रणालीतील e-sign सुविधेमधील काही तांत्रिक अडचणीमुळे कार्यमूल्यमापन अहवाल ऑनलाईन पध्दतीने नोंदविण्यासाठी निश्चित केलेली दिनांक ३१.१.२०१८ ची मुदत आता दिनांक १६.२.२०१८ पर्यंत वाढविण्यात येत आहे. दिनांक १६.२.२०१८ पर्यंत सन २०१६-१७ चे कार्यमूल्यमापन अहवाल अंतिम करण्यात यावेत . (ज्या कार्यमूल्यमापन अहवाला संदर्भात अभिवेदन प्राप्त होईल असे कार्यमूल्यमापन अहवाल वगळून) **दिनांक १६.२.२०१८ नंतर सदर प्रणालीत सन २०१६-१७ या वर्षाचे कार्यमूल्यमापन अहवाल नोंदविता येणार नाहीत.**

४. सन २०१६-१७ चे कार्यमूल्यमापन अहवाल विहित वेळेत प्रतिवेदन अथवा पुनर्विलोकन अधिकारी यांनी भरले नाहीत, तर त्याबाबींची नोंद त्या प्रतिवेदन/ पुनर्विलोकन अधिका-यांच्या सन २०१७-१८ च्या कार्यमूल्यमापन अहवालाच्या परिशिष्ट-अ मधील भाग-१, अ.क्र.८ मधील रकान्यात आस्थापना अधिकारी/ संस्करण अधिकारी यांनी घ्यावी.

५. या बाबींचे गांभीर्य लक्षात घेऊन सर्व संबंधित अधिकारी, प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिकारी आणि संस्करण अधिकारी यांनी तात्काळ कार्यवाही करावी.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.mahararshtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०२०२१७२४२८३८०७ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

Bhatu Sambhu Wankhede

Digitally signed by Bhatu Sambhu Wankhede
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=493af62b137d3b8ad2fb93133b4b083c9cafb89b6793bfa8d7ebb7ba735e6d9d, serialNumber=454f1eaad82ae32f06775522a32735d46dc9a815a777254a802deaa980512d11, cn=Bhatu Sambhu Wankhede
Date: 2018.02.02 17:28:09 +05'30'

(भ. सं. वानखेडे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. अपर मुख्य सचिव (सेवा) , सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग प्रशासकीय विभाग
५. सह सचिव/ उपसचिव (गृह विभाग, वित्त विभाग, महसूल विभाग, ग्राम विकास विभाग, सहकार विभाग, नगर विकास विभाग, सामान्य प्रशासन विभाग)
६. सर्व मंत्रालयीन विभागाच्या सर्व आस्थापना शाखा
७. उप सचिव (का.१३), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
८. निवडनस्ती/कार्या-१३